11 SEP 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दीक्षान्त समारंभाचा पोशाख, सत्काराच्या शालीचा रंग बदलणार

## शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेकडून समिती स्थापन

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १० : दीक्षान्त समारंभाचा पोशाख आणि विविध कार्यक्रमांत प्रमुख पाहुण्यांच्या सत्कारावेळी त्यांना दिल्या जाणाऱ्या शालीचा रंग, आकार बदलण्यासाठी नवीन समितीचे गठण आज शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत करण्यात आले. विधी (लॉ), अभियांत्रिकी, आदी अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षातील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना कॅरिऑनची सवलत देण्याचा प्रस्ताव मान्य करण्यात आला.

विविध ६७ विषयांवर चर्चा झालेल्या या बैठकीच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर सचिवपदी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. विद्यापीठात नव्याने अध्यासन स्थापनेची मागणी करणाऱ्या संस्था-संघटना, आदींनी ते अध्यासन चालविण्याच्या खर्चासाठी निधी उभारण्याची व्यवस्था करावी, या ठरावाला मान्यता देण्यात आली. आंतरराष्ट्रीय विद्यार्थी वसतिगृहाची सुधारित नियमावली, विद्यापीठ परिसरामध्ये वृक्षलागवड करण्यास आणि विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांना मुदतवाढ देण्यात आली. ॲड. रूपाली पणदुरकर अभ्यासिका विस्तारीकरणाचा ठराव मान्य करण्यात आला. शिवाजी पेठेत स्थलांतरित झालेल्या कॉलेज ऑफ आर्किटेक्चरचा प्रस्ताव मान्य करण्यात आला. वाचन प्रेरणा दिन दरवर्षी साजरा करण्यास आणि शिवचरित्राचे वाचन करण्यास मान्यता देण्यात आली. माजी कुलसचिव डॉ. डी. व्ही. मुळे यांच्याबाबतचा याचिकेचा विषय आणि विद्यापीठ निधीवरील कर्मचाऱ्यांच्या सातव्या वेतन आयोगाबाबतच्या विषयांवर पुढील बैठकीत चर्चा करण्याचा निर्णय घेण्यात आला.



11 SEP 2024 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सर्व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना कॅरिऑन करण्यास मान्यता

## शिवाजी विद्यापीठातील व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत निर्णय : विचारवेध परिषद खर्चास मंजुरी

प्रतिनिधी
कोल्हापूर

माजी कुलसचिव डॉ. डी. व्ही. मुळे यांच्याबद्दलचा कोर्टातील दावा मागे घेण्याचा विषय बैठकीत मांडण्यात आला होता. परंतू सदस्यांचे एकमत न झाल्याने हा विषय पुढे ढकलला. तसेच शिवाजी विद्यापीठात होणाऱ्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज विचारवेध परिषदेच्या खर्चासाठी मान्यता. त्याचबरोबर सर्व अभ्यासक्रमाच्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना कॅरिऑन करण्यासाठी विद्यापरिषदेच्या शिफारशीस व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मान्यता दिली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के तर सचिवपदी डॉ. व्ही. एन. शिंदे होते.

शिवाजी विद्यापीठातील व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत स्वर्गीय दिवाणबहाद्दुर अण्णासाहेब लठ्ठे स्मृती व्याख्यानमाला घेण्यास परवानगी दिली. अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे १ हजार ६०० विद्यार्थी



अनुत्तीर्ण झाले होते. त्यांनी स्वायत्त संस्थांप्रमाणे कॅरिऑन करण्याची मागणी केली होती. त्याप्रमाणे विद्या परिषदेसह व्यवस्थापन परिषदेने सर्व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना कॅरिऑन करण्यास मान्यता दिली. स्वावलंबी तत्वावरील अधिकारी व सेवकांची ५८ महिन्याची थकबाकी पुन्हा वित्त व लेखा समितीसमोर पुन्हा मांडण्यास मान्यता. कनिष्ठ लेखनिक पदनाम बदल विषय न्यायप्रविष्ट असल्याने शासनाकडे फेरप्रस्ताव पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्य शासन अध्यासनांना अनुदान देत नसल्याने अध्यासनाची मागणी करणाऱ्यांनीच खर्चाची तरतुद केली पाहिजे, या विषयाला मान्यता. परीक्षेच्या उत्तरपत्रिकेचा सुधारीत दर निश्चित करण्यात आला. पर्यावरण संरक्षण समितीची नियमावली व धोरण राबवण्याची जबाबदारी नोडल ऑफिसर व कृषी मित्राकडे दिली. आंतरराष्ट्रीय विद्यार्थी वसतिगृहाची सुधारीत नियमावली मान्य करण्यात आली. वृक्षलागवडीला मान्यता देण्यात आली. विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांना पाच वर्षासाठी सेवा सातत्याऐवजी मुदतवाढ देण्यात आली. ॲड. रुपाली पणदुरकर अभ्यासिका विस्तारीकरणाचा प्रस्ताव मान्य केला. शिवाजी पेठेत स्थलांतरित झालेल्या कॉलेज ऑफ आर्किटेक्टला मान्यता दिली. विद्यापीठातर्फे करण्यात येणाऱ्या सत्कारासाठीच्या शालीचा रंग, आकार ठरवण्यासाठी व दीक्षांत समारंभाचा पोशाख नवीन करण्यासाठी समिती नेमली. खरेदी समितीचा अहवाल स्वीकारला. वाचन प्रेरणा दिन दरवर्षी साजरा करण्यास व यंदा शिवचरित्राचे वाचन करण्यास मान्यता दिली. युवा महोत्सव समितीच्या कार्यवृत्तांताला मान्यता दिली. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ६७ विषयावर चर्चा झाली.

### नेमबाज स्वप्नील कुसाळेचा सत्कार करण्यास मान्यता

पॅरिस ऑलिंपिक नेमबाजी स्पर्धेत कास्यपदक मिळवल्याबद्दल स्वप्नील कुसाळे यांचा अभिनंदनाचा ठराव मंजूर करून, त्यांचा सत्कार करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच शुटींग रेंज खेळात विद्यापीठात खेळाडू निर्माण करण्याचा विद्यापीठ प्रयत्न करणार आहे. खेळाडू तयार करण्याच्या प्रक्रियेला मान्यता देण्यात आली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 SEP 2024
पुढारी

# अभियांत्रिकी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना कॅरिऑन देण्यास व्यवस्थापन परिषदेची मान्यता

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे १ हजार ६०० अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना विद्या परिषदेसह व्यवस्थापन परिषदेने पदवी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना कॅरिऑन करण्यास मान्यता दिली. सभेच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के तर सचिवपदी डॉ. व्ही. एन. शिंदे होते.

या सभेत शिवाजी विद्यापीठात राजर्षी छत्रपती शाहू महाराज विचारवेध परिषद होणार आहे. या परिषदेच्या खर्चासाठी मान्यता देण्यात आली. स्वावलंबी तत्त्वावरील अधिकारी व सेवकांची ५८ महिन्यांची थकबाकी पुन्हा वित्त व लेखा समितीसमोर पुन्हा मांडण्यास मान्यता देण्यात आली. माजी कुलसचिव डॉ. डी. व्ही. मुळे यांच्याबद्दलचा कोर्टातील दावा मागे घेण्याचा विषय पुढे ढकलण्यात आला.

स्वर्गीय दिवाणबहादूर अण्णासाहेब लठ्ठे स्मृती व्याख्यानमाला घेण्यास परवानगी दिली. स्वावलंबी तत्त्वावरील अधिकारी व सेवकांची ५८ महिन्यांची थकबाकी पुन्हा वित्त व लेखा समितीसमोर पुन्हा मांडण्यास मान्यता कनिष्ठ लेखनिक पदनाम बद्दल विषय न्यायप्रविष्ट असल्याने शासनाकडे फेरप्रस्ताव पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला. शिवाजी पेठेत स्थलांतरीत झालेल्या कॉलेज ऑफ आर्किटेक्टला मान्यता दिली. विद्यापीठातर्फे करण्यात येणाऱ्या सत्कारासाठीच्या शालीचा रंग, आकार ठरवण्यासाठी व दीक्षांत समारंभाचा पोशाख नवीन करण्यासाठी समिती नेमण्यात आली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 SEP 2024
लोकमत

# शिवाजी विद्यापीठात उभारणार शूटिंग रेंज

## व्यवस्थापन परिषदेचा निर्णय

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : ऑलिम्पिकमध्ये भारताचे नाव कोरणाऱ्या कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरीतील कांबळवाडी गावचा नेमबाज स्वप्नील कुसाळे याच्या अभिनंदनाच्या ठरावाबरोबरच शिवाजी विद्यापीठात शूटिंग रेंज उभारण्याचा आणि माजी कुलसचिव डॉ. डी. व्ही. मुळे यांच्याबद्दलचा न्यायालयात दाखल केलेला दावा मागे घेण्याबाबतचा विषय पुढे ढकलण्याचा निर्णय मंगळवारी शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला. अभियांत्रिकी पदवी प्रथम वर्षाच्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना कॅरिऑन देण्यास या परिषदेने मान्यता दिली.

विद्यापीठात मंगळवारी झालेल्या या बैठकीसमोर ६७ विषय होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि सचिवपदी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. यात चेंजिंग इन स्टाफ आणि खरेदी समितीच्या खर्चांना, तसेच महाविद्यालयांना जादा तुकडी आणि जादा अभ्यासक्रमांसाठीही मान्यता दिली. माजी कुलसचिव डॉ. डी. व्ही. मुळे यांच्याबद्दलचा न्यायालयातील दावा मागे घेण्याचा विषय व्यवस्थापन परिषदेत एकमत न झाल्याने पुढे ढकलला. मुळे यांच्याविरोधात विद्यार्थी परिषदेने २०१५ मध्ये तक्रार दिली होती. विद्यापीठ विकास मंचचे सदस्य राज्यपाल नियुक्त सदस्य सिद्धार्थ शिंदे आणि ॲड. स्वागत परुळेकर यांनी हा दावा मागे घेण्यास विरोध केला.

याशिवाय राजर्षी छत्रपती शाहू महाराज विचारवेध परिषद होणार असून, त्याच्या खर्चासाठी समितीने मान्यता दिली. स्वर्गीय दिवाणबहादूर अण्णासाहेब लठ्ठे स्मृती व्याख्यानमाला घेण्यासही मान्यता मिळाली. अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे १ हजार ६०० विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले होते. त्यांनी स्वायत्त संस्थांप्रमाणे कॅरिऑन देण्यास विद्या परिषदेसह व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली. शिवाजी पेठेत स्थलांतरीत कॉलेज ऑफ आर्किटेक्टला मान्यता दिली. विद्यापीठातर्फे होणाऱ्या सत्कारासाठीच्या शालीचा रंग, आकार ठरविण्यासाठी तसेच दीक्षांत समारंभाचा पोशाख नवीन करण्यासाठी समिती नेमली.

### पदनाम बदलाविषयी फेरप्रस्ताव पाठविणार

स्वावलंबी तत्त्वावरील अधिकारी व सेवकांची ५८ महिन्यांची थकबाकी पुन्हा वित्त व लेखा समितीसमोर पुन्हा मांडण्यास मान्यता देण्यात आली. कनिष्ठ लेखनिक पदनाम बदलाचा विषय न्यायप्रविष्ट असल्याने शासनाकडे फेरप्रस्ताव पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. अनुदान मिळत नसल्याने अध्यासनाची मागणी करणाऱ्यांनीच खर्चाची तरतूद करण्याचा निर्णय या परिषदेत झाला.

### अभिनंदनाचा ठराव प्रथमच

सामान्यत: कोणाच्याही अभिनंदनाचा ठराव ही परिषद करत नाही. मात्र कोल्हापूरचा नेमबाज स्वप्निल कुसाळे याच्या अभिनंदनाचा ठराव या परिषदेत प्रथमच करण्यात आला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 SEP 2024
पुढारी

# शिक्षणाला आधुनिक तंत्राची जोड द्यावी : डॉ. कृष्णा पाटील

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिक्षकांनी विषयाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड द्यावी, असे प्रतिपादन दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे समन्वयक डॉ. कृष्णा पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व शिक्षकांचे सक्षमीकरण या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे होते.

डॉ. पाटील म्हणाले, शिक्षक कौशल्य, वृत्ती व ज्ञानाच्या बाबतीत अद्ययावत व सक्षम असला पाहिजे. शिक्षक दिन हा आत्मपरीक्षण करण्याचा दिवस आहे. एखादे पुस्तक, मित्र, एखादे वाक्य, एखादा आशय



शिवाजी विद्यापीठातून

आपल्या जीवनामध्ये बदल घडवू शकतो. त्यामुळे आपली शिकण्याची वृत्ती कायम ठेवावी. उपकुलसचिव शिंदे म्हणाले, शिक्षकांचे सक्षमीकरण होण्यासाठी विविध टप्प्यावर स्वतः मध्ये बदल करणे आवश्यक आहे. त्यासाठी अध्यापक विकसन कार्यक्रमामध्ये शिक्षकांनी सहभाग घेतला पाहिजे. प्रास्ताविक डॉ. प्रकाश बेळीकट्टी यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. नितीन रणदिवे यांनी केले. बबन पाटोळे यांनी आभार मानले.

11 SEP 2024 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सूरसंगम सादरीकरणाने कलाश्री महोत्सवाची सांगता



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मनात भक्तिभाव निर्माण करणारे भक्तिगीते, जुन्या आठवणींना उजाळा देणारी नाट्यगीते, चित्र आणि नृत्य अशा कलात्मक वर्षावात रसिक मन चिंब झाले. दि न्यू एज्युकेशन सोसायटीतर्फे राम गणेश गडकरी हॉल येथे आयोजित कलाश्री महोत्सवात मंगळवारी सुरसंगम संगीत कार्यक्रमाने सांगता झाली.

कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारप्राप्त सागर बगाडे यांनाही गौरवण्यात आले. हा सत्कार सुहासिनीदेवी घाटगे, संस्थेच्या नियामक मंडळाचे सल्लागार विनोदकुमार लोहिया, सचिव प्राचार्य प्रभाकर हेरवाडे, सहसचिव प्राचार्य एस. एस. चव्हाण, डॉ. शीतल धर्माधिकारी, डॉ. विनोद ठाकूर देसाई या मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला.

हा कार्यक्रम चालू असताना सुभाष वाणी, कुलदीप जठार, ओंकार गोमासे यांनी चित्रकलेच्या विविध माध्यमातून श्री गणेशाचे चित्र रेखाटले. कार्यक्रमाची निर्मिती व संकल्पना प्र. विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूर देसाई यांची होती. संदेश गावंदे, आकाश साळोखे, विक्रम परीट, ओंकार सूर्यवंशी यांनी वाद्य साथ केली. विविध नृत्यांना भाग्यश्री कालेकर यांनी मार्गदर्शन केले. नाट्य विभागाचे डॉ. संजय तोडकर, विकास कांबळे, राज पाटील, युवराज केसकर यांनी लघुनाटिकेला दिग्दर्शन व मार्गदर्शन केले.

चित्रकलेला बबन माने यांनी मार्गदर्शन केले. संपूर्ण कार्यक्रमाचे निवेदन विश्वराज जोशी यांनी केले. यावेळी डॉ. ज. ल. नागावकर, प्रल्हाद जाधव, प्रदीप कुलकर्णी यांच्यासह रसिक उपस्थित होते.

11 SEP 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘सूरसंगम’ने कलाश्री महोत्सवाची सांगता

## शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने सादरीकरण

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने सादर केलेल्या 'सूरसंगम'च्या दिमाखदार कार्यक्रमाने न्यू एज्युकेशन सोसायटी आयोजित 'कलाश्री' महोत्सवाची मंगळवारी सांगता झाली.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते गणेशाच्या आरतीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी सुहासिनीदेवी घाटगे, संस्थेच्या नियामक मंडळाचे सल्लागार विनोदकुमार लोहिया, सचिव प्राचार्य प्रभाकर हेरवाडे, सहसचिव प्राचार्य एस. एस. चव्हाण, डॉ. शीतल धर्माधिकारी, डॉ. विनोद ठाकूर देसाई उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात 'पंचतुंड नर रुंड मालधर' या नांदीने झाली. यानंतर



शिवाजी विद्यापीठाच्या वतीने सादर करण्यात आलेल्या 'सूरसंगम' कार्यक्रमाने न्यू एज्युकेशन सोसायटीच्या 'कलाश्री' महोत्सवाची मंगळवारी सांगता झाली.

'आगा करुणा करा' (ऋचा गावंदे) या अभंगाने सभागृहातील वातावरण भक्तिमय झाले. यानंतर 'एकला नयनाला' (अन्वी वालावलकर) या आणि 'सुरत पिया की' (साईश प्रभुदेसाई) या दोन नाट्यगीतांनी संगीत नाटकांचा काळ उभा केला. प्रतीक्षा पवार यांच्या गझलने आणि हर्षदा परीट यांच्या सुरेल भावगीतांनी रसिकांना मोहित केले. शर्वरी कुलकर्णी आणि श्रद्धा शुक्ल यांच्या लावणी गायनाने वातावरण निर्मिती केली.

यानंतर प्रियांका मिरजकर, रणजित बुगले, अश्विनी व रोहिणी तेली, ऋचा गावंदे, गौरी पाटील या गायक-गायिकांनी रंगत वाढवली. सुभाष वाणी, कुलदीप जठार व ओंकार गोमासे यांनी चित्रकलेच्या विविध माध्यमातून गणेशाचे चित्र रेखाटले. निर्मिती डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांची होती. संदेश गावंदे, आकाश साळोखे, विक्रम परीट, ओंकार सूर्यवंशी यांनी वाद्य साथ केली. भाग्यश्री कालेकर यांनी नृत्य दिग्दर्शन केले. नाट्यविभागाचे डॉ. संजय तोडकर, विकास कांबळे, राज पाटील, युवराज केळुसकर यांनी लघुनाटिकेचे दिग्दर्शन केले. चित्रकलेला बबन माने यांचे मार्गदर्शन लाभले. निवेदन विश्वराज जोशी यांनी केले. यावेळी डॉ. ज. ल. नागावकर, प्रल्हाद जाधव, प्रदीप कुलकर्णी, रसिक उपस्थित होते.